# प्रकरण तिसरे

## भारतातील सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण

३.१ सहकारी शिक्षणाची आवश्यकता

३.२ भारतातील सहकारी शिक्षणाचा प्रारंभ आणि विकास

३.३ भारतातील सहकारी शिक्षणाची उद्दिष्टे

३.४ भारतातील सहकारी शिक्षणाचे घटक

३.५ भारतातील सहकारी शिक्षण पद्धतीची रचना

३.६ अभ्यासक्रम

३.७ उपसंहार

समासदांचे आर्थिक व सामाजिक हितरक्षण व हितसंवर्धन हे सहकाराचे उद्दिष्ट आहे. समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या व्यक्तींच्या हितासाठी सहकारी संस्था निर्माण झाल्या. सहकाराची उद्दिष्टे गाठण्या-साठी ब्रिटनमधील रॉशडेल येथील सहकार प्रणेत्यांनी सहकारी संघटन कोणत्या तत्वानुसार चालवावे या विषयी मार्गदर्शन केले. या तत्वामुळेच सहकार हा एक वेगळा आर्थिक संघटनेचा प्रकार मानला जातो.

सहकाराच्या प्रमुख तत्वांपैकी सहकारी शिक्षण हे एक महत्वाचे तत्व आहे. रॉशडेल प्रणेत्यांनी या तत्वाचा आवर्जून उल्लेख केला आहे. या दृष्टीने भारतातही सहकारी शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे.

भारतातील सहकारी चळवळ दुर्बलांच्या शिक्षणातूनच झाली. लोकप्रबोधनाच्या माध्यमातून सहकारी चळवळ सामान्यांपर्यन्त पोहोचवण्याचे मूलभूत उद्दिष्ट समोर ठेऊन अनेक सहकार महर्षींनी सहकारी चळवळीचा पाया घातला आहे. चळवळ वाढविण्यासाठी ह्या पध्दतीच्या शिक्षणामुळे सहकारी संस्थांची वाढ झपाटयाने झाली. अलिकडे मात्र चळवळीची गुणवत्ता वाढविण्यासाठी सहकारी शिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे. कारण लोकशाही व्यवस्थापन, खुले समासदत्व, सहकाराचे व्यावसायीकरण, या सारख्या गोष्टींबाबत शिक्षणाचा आशय व दिशा वेगळ्या पध्दतीने हाताळाव्या लागणार आहेत.

## ३.१ सहकारी शिक्षणाची आवश्यकता :

सहकारी चळवळ मजबूत पायावर उभी रहाण्यासाठी सहकारी चळवळीचा विविधांगी विकास करण्यासाठी जागरूक व क्रियाशील समासद वर्ग असावा लागतो. प्रत्येक समासदास सहकाराची उद्दिष्टे व तत्वे यांचे ज्ञान असावे लागते. तरच सहकारी संस्थांचे समासद व प्रतिनिधी आपल्या संस्थेचा कारभार योग्य पध्दतीने चालवू शकतील.

सहकारी संस्था चालविण्याचे कौशल्य व तंत्र यासारख्या बाबी नागरिकांना शिकविल्या जातात यातूनच नागरिकांचा आर्थिक फायदा होतो. सहकारी शिक्षणामुळे सभासदांच्या बौध्दिक कक्षा रुंदावण्यास व व्यक्तिमत्वाचा विकास होण्यास मदत होते. सहकारी संस्था म्हणजे केवळ पतपुरवठा संस्था नव्हेत अथवा स्वस्त वस्तू व सेवा मिळविण्याचे साधन नव्हे, तर व्यापक अर्थाने सहकारी चळवळ म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र, कौटुंबिक अर्थशास्त्र, शेतीचे अर्थशास्त्र आणि लोकशाही देशातील नागरिकांना आवश्यक असलेल्या हक्क व कर्तव्यांची जाणीव निर्माण करणारी ती एक प्रयोगशाळा होय.

सहकारी चळवळ यशस्वी पायावर उभी करण्यासाठी खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांशी स्पर्धा करण्यासाठी सहकारी शिक्षणाची सुरुवातीपासूनच तरतूद करणे महत्वाचे ठरते. सहकारी चळवळीवर श्रध्दा असलेला सभासद वर्ग तयार केल्याशिवाय स्वत:च्या समान गरजा सहकाराद्वारे पूर्ण करण्याची महत्वाकांक्षा सफल होऊ शकणार नाही.

भारतासारख्या विकसनशील देशात सहकारी चळवळीच्या प्रवर्तनाची व विकासाची जबाबदारी सरकारने घेतलेली आढळते. परिणामी सहकारी चळवळ आर्थिक नियोजनाचा एक भाग बनते. भारताच्या आर्थिक नियोजनात सहकाराला वैशिष्टयपूर्ण स्थान दिले गेले आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात सहकारी अर्थव्यवस्थेतील कुशलता वाढविण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे हे स्पष्ट केले आहे. आर्थिक विकासाची गती वाढवण्यात सहकारी शिक्षण उपयुक्त ठरते.

सहकारी चळवळीची निकोप वाढ होण्यासाठी त्याचे बीजारोपण नीट झाले पाहिजे. यासाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक मानले गेले आहे. भारतासारख्या विकसनशील देशात स्वार्थासाठी सहकारी

संस्था काढण्याची प्रवृत्ती आढळते. कमी किंमतीत वस्तू मिळवणे, सुलभ हप्त्याने कर्ज मिळवणे, दुर्मिळ वस्तू उपलब्ध करणे, यासाठी सहकारी संस्था स्थापन केल्या जातात. लोकांना सहकाराचा मूळ हेतू माहित नसतो. त्यासाठी सहकारी शिक्षण आवश्यक आहे. सहकारी संस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, संस्थामधील गैरव्यवहाराला आळा घालण्यासाठी अधिकारी, सभासद, नोकर वर्ग व सामान्य नागरिक यांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण अत्यावश्यक ठरते.

१९६० मध्ये सहकार प्रशिक्षणाविषयी सूचना करण्यासाठी एका अभ्यास गटाची नियुक्ती केली गेली. या अभ्यास गटाने `राष्ट्रीय मंडळा`च्या स्थापनेची शिफारस केली. या मंडळाच्या शिफारशी पुढील प्रमाणे आहेत :

१) सहकारी शिक्षण व प्रशिक्षण सहकारी चळवळीचा महत्वाचा भाग मानण्यात यावा.
२) कनिष्ट प्रशिक्षण केंद्राची प्रशासकीय जबाबदारी राज्य सहकार संघाकडे सोपविण्यात यावी. या केंद्राचा खर्च मात्र केंद्र व राज्य सरकारे यांनी मिळून करावा.
३) राष्ट्रीय सहकार संघाकडे सक्रीय पातळीवर सहकारी प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.
४) सहकारी कायद्यात दुरूस्ती करून राज्य संघाच्या शिक्षण निधीत वाढ करावी.

राष्ट्रीय सहकारी संघ जी त्रिस्तरीय शिक्षणपध्दती राबवते त्यामध्ये जिल्हा सहकार संघातर्फे जिल्हा पातळीवर सहकारी शिक्षण द्यावे असे सुचविले आहे. जिल्हा पातळीवर सेवकांना व इतरांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा समावेश होतो. सर्व पातळीवर शिक्षण देण्यासाठी आणि शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी दोन विभागातून शैक्षणिक

कार्य हाताळले जाते. (१) शासकीय पुरस्कृत सर्व पातळीवरील सहकार प्रशिक्षण केंद्रामार्फत (महाविद्यालयामार्फत) आणि (२) राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा सहकारी संस्थामार्फत राबविले जाणारे शैक्षणिक कार्यक्रम यांचा त्यामध्ये समावेश होतो.

### ३.२ भारतातील सहकारी शिक्षणाचा प्रारंभ व विकास :

आतापर्यन्त अनेक सहकार तज्ज्ञांनी, सहकारी चळवळीच्या संशोधकांनी भारतासारख्या विकसनशील देशात सहकारी शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक व महत्वपूर्ण असल्याचे स्पष्ट केले आहे.

१९१४ मध्ये मद्रास येथे सर्वात प्रथम सहकाराचे शिक्षण देण्याचे प्रयत्न झाले. १९१५ मध्ये मॅकलगन कमिटीने[१] कोणत्याही सहकारी संस्थेच्या नोंदणीपूर्वी व नंतर सभासदांना सहकारी तत्वाचे व व्यवहाराचे शिक्षण व प्रशिक्षण देण्याची आवश्यकता व्यक्त केली. या समितीने असाही निष्कर्ष काढला की, भारतातील ग्रामीण पतपुरवठ्यातील व अन्य सहकारी संस्थामधील दोषांचे प्रमुख कारण सहकारी शिक्षणाचा अभाव हेच होय.

१९२८ मध्ये रॉयल कमिशनच्या मते[२] सहकारी तत्वे-व्यवहार व कार्यपध्दतीच्या शिक्षणांचे सातत्याने व परिणामकारकपणे, प्रामाणिकपणे प्रयत्न हाच ` सहकारी चळवळीच्या यशाचा मार्ग होय ` असा उल्लेख केला आहे. १९३५ मध्ये सर माल्कम डार्लिंग्नी सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाबाबत एक योजना आखली. या योजनेनुसार सहकारी संस्थांच्या

---

१) ` को-ऑपरेशन इन इंडिया ` ले. डॉ. बी.एस. माथूर, सुधारित आवृत्ती, १९८६, पा.क्र. ५१९.

२) ` सहकार तत्वे आणि व्यवहार ` ले.ए.आर. रायरवेलकर व प्रा. ए.जी. ढांगे, पा.क्र. ६६.

सभासदांना सहकाराचे शिक्षण दिले जाणार होते. पण ही योजना कागदोपत्रीच राहिली.

१९४७ साली पुण्यात सहकाराचे शिक्षण देण्यासाठी एक ट्रेनिंग कॉलेज काढण्यात आले. नोव्हेंबर, १९५३ मध्ये[3] भारत सरकार व रिझर्व्ह बँकेच्या मदतीने सहकार प्रशिक्षणासाठी मध्यवर्ती समिती नेमली गेली. या समितीच्या शिफारशी पुढील प्रमाणे आहेत :

१) प्रशिक्षणाचे उच्च, मध्यम व कनिष्ट असे वर्गीकरण करावे.
२) मध्यम श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पाच प्रादेशिक केंद्रे स्थापन करावीत.
३) पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजला अखिल भारतीय प्रशिक्षणाचा दर्जा द्यावा.

मध्यवर्ती समितीद्वारे खालील ठिकाणी प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली गेली - भावनगर, कल्याण, हैद्राबाद, तिरुपती इ.

१९५२-१९५८ पर्यन्त भारतातील सहकार व प्रशिक्षणाचा आढावा घेऊन प्रा. लॉर्ड्स व एम्. डार्लिंग यांनी सांगितले की, भारतात प्रात्यक्षिकांवर भर दिला पाहिजे. त्यानुसार १९६० मध्ये सहकारी प्रशिक्षण अभ्यास गटाची नियुक्ती केली गेली. या गटाने सहकारी प्रशिक्षणासंबंधी मोलाच्या सूचना दिल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.[4]

१) सहकाराच्या शिक्षणाची वर्गवारी, उच्च, मध्यम आणि कनिष्ट अशी त्रिस्तरीय असावी.

----------

३) ' को-ऑपरेशन इन इंडिया अँन्ड अब्रॉड ' ले.प्रो.के. आर. कुलकर्णी, पा.क्र. ४८९, व्हाल्यूम नं.१, प्रकाशक व्ही.व्ही. बापट.

४) तथोक्त.

२) भारतातील सहकारी क्षेत्रातील उच्च श्रेणीच्या अधिकाऱ्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी अखिल भारतीय स्तरावर पुणे येथे असलेल्या सहकारी शिक्षण केंद्राला मान्यता देण्यात यावी.

३) मध्यम स्तरावरील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पुणे खेरीज अन्यत्र चार ठिकाणी प्रादेशिक सहकारी प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करावी.

४) कनिष्ट स्तरावरील कर्मचाऱ्यांना सहकाराचे प्रशिक्षण देण्यासाठी राज्यात जिल्ह्याच्या ठिकाणी केंद्रे स्थापन करावीत.

या सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडियाची स्थापना केली. या संघटनेवर राज्य सहकारी संघटना व जिल्हा सहकारी संघटनामार्फत सहकारी क्षेत्रातील शिक्षण व प्रशिक्षण योजना पार पाडण्याची जबाबदारी सोपवली. पुणे, मद्रास, आनंद व गोपाळपुरा येथे प्रशिक्षण महाविद्यालये स्थापन केलेली आहेत. राज्य पातळीवर सहकारी शिक्षणाची निरनिराळ्या राज्यात निरनिराळी व्यवस्था आहे. कनिष्ट स्तरावरील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण शाळा काढण्यात आल्या आहेत. १९६० मध्ये शेती प्रशिक्षणावर भर देण्यात आला. १९६१ मध्ये श्री. एस.डी. मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी शिक्षण व प्रशिक्षण विषयक अभ्यासगटाची नियुक्ती केली त्यातील काही महत्वाच्या शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

१) सहकारी शिक्षण व प्रशिक्षण यांची अंतिम जबाबदारी सहकारी चळवळीने उचलली पाहिजे.

२) सहकारी शिक्षण व प्रशिक्षण यांच्या खर्चाच्या तरतुदीसाठी सहकारी संस्थांनी त्यांच्या नफ्याच्या किमान १ टक्का रक्कम राज्य सहकारी संघाकडे वर्गणी रूपाने द्यावी.

३) शाळा, महाविद्यालये, विश्वविद्यालये, विद्यापीठे व शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयात सहकार या विषयाचा समावेश केला जावा.

४) सहकारी प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय पातळीवर एक मंडळ नेमण्यात यावे.

५) एक राष्ट्रीय प्रशिक्षण संशोधन संस्था निर्माण करावी.

६) सहकारी केंद्रातील ग्रंथालयाच्या सोयी वाढविण्यात याव्यात.

वरील ब-याचशा शिफारशी अंमलात आलेल्या आहेत. १९६६ च्या आंतरराष्ट्रीय सहकार संघटन आयोगाने[५] सर्वप्रकारच्या सहकारी सोसायटर्यांनी आपल्या सभासदांना, कर्मचा-यांना व अधिका-यांना सहकारी शिक्षण सक्तीचे केले पाहिजे असे प्रतिपादन केले.

डॉ.डी.जी. कर्वे [६] यांच्या मतानुसार ` सहकारी शिक्षण कमी महत्वाचे किंवा ऐच्छिक अशा स्वरूपाचे अंमलात आणावयाचे असल्यास तो सहकाराच्या विकासातील एक अडथळा होईल.`

सर लॅटीन यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास` इव्हन गॉडस् फाइट इन व्हेन्.`

१९६५-६६ मध्ये रिझर्व्ह बँकेने सहकारी क्षेत्रातील कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यासाठी एक नवा कोर्स तयार केला.

भारतातील सहकारी क्षेत्रामध्ये अजूनही उणीवा आढळून आल्याने डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली सहकार शिक्षण व

----------

५) ` को-ऑपरेशन ईन ईंडिया`- ले डॉ. बी.एस. माथूर, ३ री आवृत्ती, १९८६, पा.क्र. ४२०.

६) तथोक्त.

प्रशिक्षण यांचा अभ्यास करण्यासाठी एका अभ्यास गटाची स्थापना केली. त्यातील शिफारशी खालील प्रमाणे आहेत.[७]

१) सहकार प्रशिक्षण समितीचे रूपांतर राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण समितीमध्ये केले जावे. भारत सरकार व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मदतीने प्रशिक्षण कार्यक्रमांची रूपरेषा ठरविली जाईल असे स्पष्ट केले.

२) सहकारी व्यवस्थापनाचे शिक्षण देण्यासाठी ५ वर्षांची एक योजना तयार केली.

३) मार्च १९८२ अखेर सहकाराचे शिक्षण देण्यासाठी ५९१ केंद्रांची स्थापना केली.

४) मार्च १९८२ अखेर काही फिरती प्रशिक्षण केंद्रेही उघडण्यात आली.

राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण समितीने सहकारी व्यवस्थापनातील दोष दूर करण्यासाठी सहकारी प्रशिक्षण केंद्रे वाढवावीत असेही प्रतिपादन केले.

भारतात सहकारी शिक्षण विषयक त्रिस्तरीय योजना राबविली जात आहे. सहकारी व्यवस्थापनाचे उच्च स्तरावरील शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी पुणे येथे वैकुंठ मेहता[८] नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ को-ओपरेटिव्ह मॅनेजमेंट ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेला केंद्र सरकारचे पूर्णपणे आर्थिक सहाय्य आहे. या संस्थेने १९८०-८५ या सहाव्या योजनेच्या काळात अविकसित राज्यांसाठी नवीन सहकारी शिक्षणाच्या योजना आखल्या जाव्यात असे सुचविले. या योजनेत पत्रव्यवहाराद्वारा सरकारी प्रशिक्षण देण्याची योजना

---

७) सहकार - ले.प्रा. सराफ व प्रा. आचार्य, प्रकाशन वर्ष १९८९.
८) को-ऑपरेशन इन इंडिया - डॉ. बी.एस. माथुर, पा.क्र. ५३२.

राबविण्यात आली. जे प्रशिक्षणार्थी नियमितपणे शिक्षण घेऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी ही योजना उपयुक्त ठरली. सहकारी शिक्षणाच्या प्रसारासाठी भारत सरकारने जरी सर्वव्यापी प्रयत्न केले असले तरी अद्याप ते अपुरे आहेत असे जाणवते.

### ३.३ भारतातील सहकारी शिक्षणाची उद्दिष्टे :

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्यावतीने प्रसिध्द झालेल्या ` सेव्हन डिकेड्स ऑफ इन्नोवेटिव्ह बँकिंग ` या पुस्तकामध्ये खालील उद्दिष्टांचा उल्लेख आहे :

१) सहकारी चळवळीच्या विकासासाठी आणि वाढीसाठी सहकारी शिक्षणाचा उपयोग करून घेणे.

२) सहकारातील अव्यक्त सामर्थ्ये सहकारी शिक्षणामुळे पुढे येतात म्हणून त्याला महत्त्व देणे गरजेचे आहे.

३) एकमेकांच्या सहकार्याने स्वत:चाही विकास साधणे.

४) सहकारी शिक्षणाने सहकारी व्यवस्थापन प्रभावी बनविणे.

५) सहकारी शिक्षणाने सहकारी चळवळीत गुणवत्ता आणणे.

६) नाविन्ये निर्माण करण्यामध्ये अनुकूलता निर्माण करणे.

७) समाजाला आवश्यक लाभाची कल्पना यावी आणि त्यादृष्टीने संयुक्त कृती करता यावी या दृष्टीने शिक्षणाचे आयोजन करणे.

८) सहकार ही एक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि लोकशाही यंत्रणेची संघटन पध्दती आहे. याची कल्पना देणे आणि याद्वारे समाज प्रबोधन, प्रशिक्षण यातून सहकारी समाज निर्माण करणे.

९) भांडवलशाही आणि समाजवाद यामध्ये सुवर्णमध्य साध्य करणारी ही यंत्रणा आहे याची जाणीव ठेऊन भारतीय अर्थव्यवस्था मिश्र असल्याने सहकारी चळवळीचे स्थान निश्चित

कोणते आहे याची जाणीव करून देणे इ. याशिवाय काही तज्ज्ञ लोकांनीही सहकारी शिक्षणासंबंधी बहुमोल असे विचार मांडले आहेत.

रोजगार निर्मितीसाठी सहकारी शिक्षण उपयुक्त आहे. नोकरीच्या मागे न लागता युवकांनी स्वयंरोजगार करावा व त्यासाठी सहकारी शिक्षण घेऊन उद्योग व्यवसाय करावेत. (दामजीभाई विक्रमसी, अध्यक्ष नॅशनल एज्युकेशन सोसायटी, खामगांव).[१०]

डॉ. धनंजयराव गाडगीळ स्मृती व्याख्यानमालेत शेतीच्या अर्थशास्त्रामध्ये उत्पादनाचे अर्थशास्त्र, पतपुरवठयाचे अर्थशास्त्र व खरेदी-विक्रीचे अर्थशास्त्र यांचा समावेश होतो. या सर्व घटकांचे सहकारी चळवळीच्या सर्व सदस्यांनी शिक्षण घेतले पाहिजे असे मत प्रा. वि.म. दांडेकर यांनी व्यक्त केले.[११]

ज्यांच्यावर सहकारी सोसायटया अवलंबन आहेत त्यांच्या संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याची मानवतेच्या दृष्टिकोनातून गरज आहे. असे मत माजी सहकार मंत्री बाळासाहेब भारदे यांनी व्यक्त केले.[१२]

वरील उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी भारत सरकार रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी संयुक्तपणे सहकारी शिक्षणाची सर्वव्यापी चळवळ राबविणेचा प्रयत्न केला आहे.

## ३.४ सहकारी शिक्षणाचे घटक :

सहकारी शिक्षणामुळे समाजातील विविध घटकांचा दुहेरी फायदा होतो. एक स्वत:स सहकारी संस्थांच्या कारभाराविषयीचे ज्ञान मिळते. दुसरे सहकारी शिक्षणामुळे सहकारी तत्वांची योग्यरितीने अंमलबजावणी होते. सहकारी शिक्षणाच्या या चळवळीमध्ये समाजातल्या बऱ्याच घटकांना सामावून घेतले आहे.

१) सहकारी नेतृत्व सहकारी शिक्षणामुळे प्रभावशाली बनते. सहकाराचे तत्वज्ञान व सहकारी कार्यपध्दती लोकांपर्यन्त पोचविण्यासाठी प्रभावशाली नेतृत्व हवे असते. विशेषत: ग्रामीण नेतृत्व यामुळे निर्माण होते.

२) सभासद व्यक्तींसाठी सहकारी शिक्षणाची गरज आहे. विशेषत: भारतासारख्या विकसनशील देशात समाज प्रबोधन सहकारी चळवळीमुळे सुकर होते. शिवाय दुर्बलांच्या हित-रक्षणासाठी ही चळवळ असल्याने सभासदांना सहकारी शिक्षणाची गरज आहे.

३) युवकांना त्यांच्या शालेय अभ्यासक्रमापासूनच सहकारी शिक्षणाची आवश्यकता आहे. महाविद्यालयीन अभ्यासक्रमा-मध्येही सहकारी शिक्षणामुळे युवकांच्या मनात सहकारी चळवळीविषयी जागरूकता निर्माण होते.

४) स्त्रियांनाही सहकारी शिक्षणाची नितांत गरज आहे. स्त्रिया हा समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. घर आणि घराबाहेरही स्त्रियांनी सहकारी शिक्षण अंगी बाणवण्यास समाजाच्या आर्थिक विकासास मदत होते. मुलांवर सहकारी प्रवृत्तीचे संस्कार त्या करू शकतात. सहकारी ग्राहक भांडारे इ. सारख्या ठिकाणीच खरेदी करावी असे स्त्रियांनी ठरविल्यास सहकारी चळवळीचा मूळ हेतू सफल होईल. इंग्लंडमधील ग्राहक सहकारी सोसायटयांचे यश हे त्याचे बोलके उदाहरण आहे.

५) बिगर सभासद व्यक्तींनाही सहकारी शिक्षणामुळे सहकारी संस्थापासून कोणते लाभ मिळू शकतात हे कळून येते.

६) सहकारी संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तर सहकारी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. सहकारी संस्थेचे कामकाज करणारे कर्मचारी सहकारी तत्वाविषयी अज्ञानी असल्यास संस्थेचा कधीच फायदा होणार नाही.

७) सहकारी संस्थांच्या सचिवासाठी सहकारी शिक्षण तर अत्यावश्यक आहेच शिवाय सहकारी संस्थेचे कामकाज नियंत्रित करण्यासाठी त्याला सहकारी तत्वप्रणाली व प्रत्यक्ष प्रशिक्षण यांची आवश्यकता आहे.

८) उच्चस्तरावरील अधिका-यांना सहकारी शिक्षणाची व प्रशिक्षणाचीही गरज आहे.

९) मध्यम स्तरावरील अधिकारी व कनिष्ट स्तरावरील काम करणा-या सर्व व्यक्ती यांनाही सहकारी शिक्षणाची गरज आहे.

३.५ भारतातील सहकारी शिक्षण <u>पध्दतीची रचना :</u>

भारतात सहकारी शिक्षण पध्दतीची रचना त्रिस्तरीय आहे.

| | | |
|---|---|---|
| १. राष्ट्रीय पातळीवर | : | राष्ट्रीय सहकारी संघ |
| २. राज्य पातळीवर | : | राज्य सहकारी संघ |
| ३. जिल्हा पातळीवर | : | जिल्हा सहकारी बोर्ड |

(१) राष्ट्रीय सहकारी संघ ही सर्वोच्च संस्था आहे. तिची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत :

१. देशात सहकारी चळवळीचे महत्व वाढविणे.
२. सहकारी संघटना मजबूत करण्यासाठी लोकांना मदत व मार्गदर्शन करणे.
३. सहकारी तत्वप्रणालीचा प्रवक्ता म्हणून काम पहाणे.
४. प्रशासन व मार्गदर्शन इ. साठी स्वतंत्र सहकारी प्रशिक्षण समितीची नियुक्ती केली जाते. कै. वैकुंठलाल मेहता नॅशनल इन्स्टिटयूट आणि १३ प्रशिक्षण केंद्रे या कमिटीच्या देखरेखाली आहेत.

५. सहकार विषयक संशोधन व मार्गदर्शन करणे हे काम संघाकडे आहे.

(२) राज्य पातळीवर राज्य सहकारी संघ, सभासद शिक्षणाचा कार्यक्रम आखते. या संघाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.


१. सहकारी वाङ्.मय निर्माण करणे व ते प्रसिध्द करणे.
२. जिल्हा पातळीवर सहकारी शिक्षणाचा प्रसार करणे.
३. सहकारी संस्थेतील परिषदा भरविणे, सहकारी सोसायटर्या-मधील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.
४. सहकाराच्या वाढीसाठी सामाजिक आणि शैक्षणिक कार्य करणे.
५. मुंबई शहरातील सहकारी सोसायटर्यांचे व्यवस्थापन करणे आणि संलग्न सोसायटर्यांचे पर्यवेक्षण करणे.
६. आवश्यकता असेल तेथे सहकारी सोसायटर्यांना सल्ला आणि मार्गदर्शन करणे.
७. सहकाराच्या विकासासाठी प्रभावी नेतृत्व-वक्तृत्व निर्माण करणे.
८. सहकाराच्या विकासातील अडथळे शोधून काढणे व त्याबाबत मार्गदर्शनपर संशोधनात चालना देणे.
९. सहकारी शिक्षणाचे कार्यक्रम आखणे, राबविणे, परीक्षा घेणे, प्रमाणपत्रे देणे इ.
१०. वेगवेगळ्या सहकारी संस्थामध्ये अंतर्गत साहचर्याचे संबंध प्रस्थापित करणे.
११. सहकारी संघाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी स्थिर स्वरूपाची, विक्रेय, स्वत:ची मालमत्ता निर्माण करणे.
१२. जिल्हा सहकारी बोर्डाच्या कामकाजाचे पर्यवेक्षण तपासणी करणे.

(३) जिल्हा स्तरावर, जिल्हा सहकारी बोर्ड, सहकारी शिक्षणाचा प्रसार करते. या बोर्डाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

१. सहकारी शिक्षणाच्या गुणात्मक व संख्यात्मक वाढीसाठी प्रयत्न करणे.
२. सहकारी संस्थातील सचिव व इतर अनेक सेवक यांचे प्रशिक्षण वर्ग घेणे.
३. सहकारी संस्थाचे पदाधिकारी व सभासद जाणकार, जागृत व अभ्यासू होण्याच्या दृष्टीने त्यांना सहकारी शिक्षण घ देणे.
४. सहकारी संस्थेचे कार्यकर्ते, सेवक यांच्या परिषदा, परिसंवाद, मेळावे व शैक्षणिक शिबिरे आयोजित करणे आणि सहकारी संस्था पुढील अडचणी समजावून घेऊन त्या अडचणी सोडविण्यात मदत करणे.
५. सहकारी वाङ्मय प्रचार, प्रसिध्दीद्वारा सहकारी चळवळीची वाढ करणे.
६. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे, पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मर्यादित, पुणे, यांच्या मार्गदर्शनाखाली सोपविलेली इतर शैक्षणिक कामे पार पाडणे.

सहकारी शिक्षणाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी भारतात वरील प्रकारची त्रिस्तरीय योजना राबविली जाते.

भारतातील सहकारी शिक्षण दोन स्तरावरील संस्थामार्फत दिले जाते. त्याची रचना खालीलप्रमाणे आहे :




प्रासंगिक सहकारी शिक्षण जिल्हा सहकारी बोर्डामार्फत दिले जाते. प्रासंगिक सहकारी शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये खालील घटकांचा समावेश करून घेतला जातो.

१) <u>सचिव कर्मचारी प्रशिक्षण</u> -

सभासदांइतकेच सहकारी संस्थेत काम करणाऱ्या सचिव, अधिकारी व नोकरांना प्रशिक्षणाची अत्यंत आवश्यकता असते. दररोजचा कारभार व्यवस्थित चालावा या हेतूने अनुभवी प्रशिक्षित वर्ग अत्यंत आवश्यक असतो. निर्वाचित संचालक मंडळ म्हणजे सहकारी संस्थेचा कारभार पहाणारे नोकर असतात.

वर्गीकृत गटाप्रमाणे नोकरांना प्रशिक्षण देणे गरजेचे असते. गटाची विभागणी खालीलप्रमाणे केली आहे.

१. दैनंदिन कार्य करण्यासाठी कनिष्ठ नोकरवर्ग (लिपिक)
२. सहाय्यक लिपिक व लेखा लिपिक यांच्या कार्यावर देखरेख करणारा अधिकारी वर्ग.

३. व्यवस्थापक - प्रशिक्षण देताना सहकारी संस्थेचा प्रकार किंवा सहकारी खात्यातील काम लक्षात घ्यावे लागते.

कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची उद्दिष्टे :

१. वरील प्रकारच्या कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणामध्ये पुस्तकपालन, लेखाकर्म, ग्राहकांचे मानसशास्त्र, वस्तूंच्या किंमती इ. बाबतचे प्रशिक्षण द्यावे लागते.
२. सहकार चळवळीविषयी विश्वास निर्माण करणे.
३. नेतृत्व गुण निर्माण करणे व वाढविणे.
४. निरनिराळ्या कार्यात समन्वय साधणे.
५. कर्मचाऱ्यांना बढती देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे.
६. कर्मचाऱ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करणे इ.

२) कार्यकारी मंडळाला शिक्षण -

संस्थेच्या दैनंदिन कारभारावर देखरेख ठेवणे, संस्थेचे ध्येय-धोरण ठरविणे, ते राबविणे, संस्थेतील सेवकांकडून कार्ये करवून घेणे, त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे ही कार्ये कार्यकारी मंडळ करते.

हे कार्यकारी मंडळ सर्वसाधारण सभासदांच्या मतानी निवडून आलेले असते. सहकारी संस्थेच्या व्यवहारात अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाकडे असतो. यासाठी सहकारी शिक्षणाची गरज असते. बव्हंशी ग्रामीण भागातून कार्यकारी मंडळाची निवड होते. अशा व्यक्तींना आर्थिक, प्रशासकीय कायदे, संस्थेची कार्यपध्दती, सहकार तत्वे यांचे शिक्षण असणे आवश्यक आहे. अभ्यास दौरे, चर्चासत्रे, शिबिरे, आयोजित करण्यासाठी खर्चाचा हिशेब ठेवणे इ. साठी सहकारी शिक्षण आवश्यक आहे.

३) संभाव्य सभासद -

सहकारी तत्वप्रणाली, जनतेमध्ये रुजावी, वाढावी म्हणून ज्या व्यक्ती सहकारी संस्थेचे सभासद होऊ इच्छितात, अशा व्यक्तींना सहकारी तत्वप्रणाली संबंधी शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यांच्यासाठी चर्चासत्रे, शिबिरे, मेळावे आयोजित केले जातात.

४) युवक, युवती, विद्यार्थी व स्त्रिया -

या वर्गातील लोकांना सहकारी शिक्षणाची गरज आहे. समाजाच्या जडणघडणीमध्ये युवक, युवती व विद्यार्थी यांचा वाटा महत्वाचा असतो. सहकाराचे पायाभूत शिक्षण देण्यासाठी शाळा व महाविद्यालयातून ' सहकार ' या विषयाचे सर्वांगिण अध्यापन केले जाते. व्याख्याने, चर्चासत्रे, सहली, प्रात्यक्षिके यातून सहकाराचे शिक्षण दिले जाते.

स्त्रिया या कुटुंबाचा एक अविभाज्य घटक आहेत. कौटुंबिक अर्थशास्त्र त्यांच्या हाती असते. सहकारातील स्त्रियांचा सहभाग अगदी कमी आहे. तो वाढविणे आवश्यक आहे. कारण सहकारी संस्थांशी त्यांचा दैनंदिन संबंध येतो. विशेषत: ग्राहक सहकारी संस्थांशी त्यांचा जास्त संबंध येतो.

अल्पमुदतीचे इतर अभ्यासक्रम जिल्हा स्तरावर असलेल्या सहकार प्रशिक्षण महाविद्यालयामार्फत आयोजित केलेले असतात पण या अभ्यास-क्रमाशी जिल्हा सहकार बोर्डाचा काहीच संबंध नसतो.

उच्च स्तरावरील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी पुणे येथे वैकुंठ मेहता सहकार प्रशिक्षण महाविद्यालय सुरू केले आहे. येथील महाविद्यालयातून प्रतिवर्षी ३५ ते ४० विद्यार्थी प्रशिक्षित होऊन बाहेर पडतात. देशातील सहकाराची गरज पाहता ही उच्च प्रशिक्षित विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी आहे.

म्हणून पाच प उपप्रादेशिक विभागातर्फे उच्च स्तरावरील अभ्यासक्रम शिकविले जातात. त्यासंबंधी माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

| प्रशिक्षण केंद्रे | प्रादेशिक व उप-प्रादेशिक विभाग | सुरुवात झाल्याच्या तारखा |
|---|---|---|
| १) पुणे | पश्चिम विभाग : | |
| | मुंबई, मध्यप्रदेश, सौराष्ट्र व कच्छ. | १ जून, १९५३ |
| २) मद्रास | दक्षिण विभाग : | |
| | मद्रास, आंध्र, म्हैसूर, हैद्राबाद, त्रावणकोर, कोचीन व कुर्ग. | १ जून, १९५३ |
| ३) रांची | पूर्व विभाग : | |
| | आसाम, बिहार, ओरिसा, प. बंगाल, मणिपूर व त्रिपुरा | १४ आक्टोबर, १९५४ |
| ४) मीरत | उत्तर विभाग : | |
| | उत्तर प्रदेश, जम्मू, काश्मीर, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश, पेप्सू. | १६ जानेवारी, १९५६ |
| ५) इंदूर | मध्य प्रदेश : | |
| | मध्य भारत, राजस्थान, भोपाळ, अजमेर, विंध्य प्रदेश | १६ जानेवारी, १९५६ |

उच्च स्तरावरील अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षण व प्रशिक्षणामध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश होतो :

१. सहकारी शिक्षण देणारे प्राध्यापक

२. सहाय्यक उप-निबंधक

३. सहकारी संस्थांचे तालुका, जिल्हा व राज्य पातळीवरचे व्यवस्थापक.

४. मोठ्या आकारमानाच्या सहकारी संस्थेतील व्यवस्थापकांचे प्रशिक्षण.

५. पदवीधर विद्यार्थ्यांनासुध्दा स्वखर्चाने एच.डी.सी. करता येते. शिवाय पुणे व नागपूर येथे सहकारी बँकिंग या विषयाचे प्रशिक्षण देण्यासाठी मुख्य केंद्रे आहेत.

उच्च स्तरावरील अधिकाऱ्यांना लेखी व प्रात्यक्षिक असे दोन्ही स्वरूपाचे शिक्षण व प्रशिक्षण दिले जाते.

हा अभ्यासक्रम १३ महिने, १२ महिने व ११ महिने मुदतीचा असतो.

१३ व १२ महिन्यांसाठी असणारा अभ्यासक्रम : (जुना)

<u>लेखी अभ्यासक्रम</u> : <u>पहिल्या सहामाहीसाठी</u>

१) <u>आवश्यक विषय</u> :

१. सहकारी कायदे

२. सहकारी व्यवस्थापन

३. सहकारी बँक व्यवसाय आणि इतर प्रकारच्या सहकारी संस्था.

२) <u>विशेष विषय</u> :

१. बँकिंग

२. सहकारी शेती, सहकारी विपणन व सहकारी प्रक्रिया संस्था.

३. औद्योगिक सहकारी संस्था, लघुउद्योग, कुटीरोद्योग इ.

४. सहकारी व्यवस्थापन.

प्रत्यक्ष प्रशिक्षण :

प्रत्यक्ष प्रशिक्षण दोन महिन्यांचे असते. एक महिना मुंबईतील सहकारी संस्थामध्ये कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेणे तर दुसरा महिना मद्रास-मधील सहकारी संस्थामध्ये प्रत्यक्ष कामकाज पहाणे. तसेच सहकारी बँन्का, व्यापारी बँन्का यांचा तुलनात्मक अभ्यास करणे. सहकारी विपणन, राज्य सहकारी बँन्क, भू-तारण बँका, शेती पतपुरवठा विभाग, दुग्ध व्यवसाय, तेलबिया, सूत गिरणी महासंघ इ. बद्दलचा अभ्यासक्रम नंतरच्या महिन्यात केला जातो.

११ महिन्यांसाठी असणाऱ्या
एच.डी.सी. चा अभ्यासक्रम : (जुना)

अ) आवश्यक विषय :

१. सहकाराचे सिध्दांत, इतिहास आणि प्रात्यक्षिके
२. सहकार कायदे
३. पुस्तक पालन व लेखाकर्म.

ब) ऐच्छिक विषय :

पूना, रांची, मीरत व इंदूर येथे -

१. लेखाकर्म व हिशेब तपासणी
२. सहकारी बँन्का व भू-तारण बँन्का
३. शेती विपणन
४. औद्योगिक सहकारी संस्था, ग्रामीण लघु आणि कुटीरोद्योग.
५. सहकारी क्षेत्रातील वेगवेगळे विभाग इ. अभ्यासक्रम शिकविले जातात.

एच.डी.सी. चे मद्रास केंद्रातर्फे चालविले जाणारे ऐच्छिक विषय :

१. सहकारी बँन्कींग

२. भू-तारण बँन्का

३. सहकारी हिशेब तपासणी

४. शेती विपणन

५. औद्योगिक सहकार (ग्रामीण लघु व कुटीरोद्योग)

एल.डी.सी. (लोअर डिप्लोमा इन को-ऑपरेशन)

कनिष्ट स्तरावरील सहकाराचा अभ्यासक्रम महाराष्ट्रात १३ ठिकाणी चालविला जातो. दोन जिल्हात एक अशी १२ केंद्रे व मुंबईसाठी एक अशी एकूण १३ केंद्रे आहेत. त्याचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे आहे.

जिल्हा स्तरावरील सभासद, सचिव, निर्देशक व लिपिक इ. सेवकांना सहकाराचे शिक्षण, प्रशिक्षण देते. या अभ्यासक्रमाला ज्युनिअर बेसिक कोर्स असेही म्हणतात. या कोर्सचा अभ्यासक्रम पुढील प्रमाणे :

१०० मार्कांचे ४ पेपर्स पुढील प्रमाणे :

१. सहकारी पतपुरवठा व बँन्कींग

२. सहकारी कायदा

३. सहकारी संस्थांचे व्यवस्थापन

४. सहकारी संस्थांचे जमा-खर्च.

५० मार्कांचे ३ पेपर्स पुढील प्रमाणे :

१. सहकारी संस्थांची हिशेब तपासणी

२. सहकार व नियोजन

३. बिगर पतपुरवठा सहकारी संस्था.

या सिरीज चाचणी परीक्षा, अंतिम परीक्षा, वार्षिक परीक्षा, प्रशिक्षणार्थींचा निरनिराळ्या उपक्रमातील सहभाग इ. तपशील वरील अभ्यासक्रमात एकत्रित करण्यात आले आहेत.

उपसंहार :

भारतात १९१४ साली मॅकलगन कमिटीच्या शिफारशी वरून सहकारी शिक्षणाची खरी सुरूवात झाली. स्वातंत्र्यपूर्व काळातही सहकारी शिक्षण व प्रशिक्षणासाठी तत्कालीन सरकारने प्रयत्न केलेले दिसून येतात. पण सहकारी शिक्षण विषयक कार्यक्रमांना स्वातंत्र्योत्तर काळात गती मिळाली.

भारतासारख्या विकसनशील व मिश्र अर्थव्यवस्था असणाऱ्या देशात सहकारी माध्यमातून आर्थिक विकास साधण्यास वाव आहे हे जाणून १९५० सालानंतर भारत सरकारने सहकारी चळवळीच्या विकासासाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाच्या त्रिस्तरीय योजना राबविल्याने यश मिळविले आहे. सहकारी प्रशिक्षण महाविद्यालये आणि सहकारी शिक्षण व प्रशिक्षण केंद्रे यांची स्थापना करून सहकारी चळवळीच्या विकासाची योग्य दिशा आखली.

भारतातील सहकारी संस्थांच्या व्यवस्थापकांना, सभासदांना, सेवकांना प्रशिक्षित करण्यास या प्रयत्नांचा हातभार लागला आहे. पण सहकारी क्षेत्राची एकूण गरज पाहता हे प्रयत्न अपुरे आहेत असे जाणवते.

सहकार प्रशिक्षण केंद्राची संख्या वेगाने वाढत असली तरी अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. राजस्थान, आंध्र, आसाम, गुजरात, मध्य प्रदेश इ. ठिकाणी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे.

A
11710

एकीकडे प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव तर प्रशिक्षण केंद्रांच्या क्षमतेचा अपुरा उपयोग असा विरोधा भास आढळतो. प्रात्यक्षिकांचा अभाव, शैक्षणिक केंद्रातील गैरसोयी, बढतीचा अभाव, वाढत्या पगाराच्या उत्तेजनाचा अभाव या सर्व बाबींमुळे सहकारी शिक्षणाचा योग्य तितका प्रचार, प्रभाव होण्यात अडचणी निर्माण होतात.

सहकारी चळवळ यशस्वी होण्यासाठी प्रथम सभासद वर्ग शिक्षित आणि जागरूक पाहिजे. सहकारी शिक्षणाशिवाय ही जागरूकता निर्माण होणार नाही.

समाजामध्येही सहकारी चळवळीविषयी अजूनही म्हणावा तसा उत्साह दिसून येत नाही. सहकारी शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी कुशल नेतृत्वाची गरज आहे. असे नेतृत्व गुण जरी जन्मत:च काही व्यक्तीं-मध्ये असतात असे मान्य केले तरी त्या गुणांचा विकास सहकारी शिक्षणा शिवाय होणार नाही.

` रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चर ` या कमिशनच्या मताप्रमाणे सहकार अपयशी झाला तर ग्रामीण भारताची आशा मावळेल.

—x—x—x—x—x—

## परिशिष्ट ३.१

## महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे

### महाराष्ट्रातील सहकारी प्रशिक्षण संस्थांची संख्या

**प्रशिक्षण महाविद्यालये -**

१) डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील सहकारी प्रशिक्षण महाविद्यालय,
४३-१६ ए, एरंडवणा, कर्वे रोड,
गुणाधार बंगला, पुणे-४११ ००४.

२) डॉ. धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रशिक्षण महाविद्यालय, नागपूर सहकार मंदीर,
पो.बॉ.नं. ३२८, महाल नागपूर-४४० ००२.

**सहकार प्रशिक्षण केंद्रे -**

१) सहकार प्रशिक्षण केंद्र,
अध्यापक बालकाश्रम, लाल टाकीजवळ,
अहमदनगर-४१४ ००१.

२) सहकार प्रशिक्षण केंद्र,
प्लॉट नं. २२, जळगाव कोऑप.हौसिंग सोसायटी, सिव्हील कोर्टाचे मागे,
जळगांव-४२५ ००१.

३) तात्यासाहेब मोहिते सहकार प्रशिक्षण केंद्र,
श्री. शाहू मार्केट यार्ड, पूना-बेंगलोर रोड,
कोल्हापूर.

४) सहकार प्रशिक्षण केंद्र,
टिळकवाडी, शरणपूर रोड,
नासिक-४४० ०२२.

५) सहकार प्रशिक्षण केंद्र,
१०, बी.जे. रोड,
पुणे-४११ ००१.

६) सहकार प्रशिक्षण केंद्र,
सहकार भवन, मार्केट यार्ड,
सांगली-४१६ ४१६.

७) सहकार प्रशिक्षण केंद्र,
कॅम्प रोड, अमरावती-४४४ ६०२.

८) काकासाहेब दिक्षित सहकार प्रशिक्षण केंद्र,
रामदास पेठ, पोलीस स्टेशनजवळ,
अकोला-४४४ ००१.

९) रामचंद्र पाटील नागदकर सहकार प्रशिक्षण केंद्र,
स्टेट बँक कॉलनीजवळ, उस्मानपुरा,
औरंगाबाद-४३१ ००१.

१०) सहकार प्रशिक्षण केंद्र,
टिळक नगर,
लातूर-४१३ ५१२.

११) सहकार प्रशिक्षण केंद्र,
सहकार मंदीर, टिळक रोड,
नागपूर-४४० ००२.

१२) सहकार प्रशिक्षण केंद्र,
सुंदर महाराज इमारत, जटपुरा,
चंद्रपूर-४४२ ४०१.

१३) सहकार प्रशिक्षण केंद्र,
` विकास ` दुसरा माळा, फोर्ट,
मुंबई-४०० ०२३.

## महाराष्ट्रातील विभागीय सहकारी मंडळे

१) पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळ,
मर्यादित, प्लॉट नं. ई-२, गुलटेकडी,
मार्केट यार्ड, पुणे-४११ ०३७.

२) विदर्भ विभागीय सहकारी मंडळ मर्यादित,
कॅम्प रोड, अमरावती.

३) मराठवाडा विभागीय सहकारी संघ मर्यादित,
स्टेट बँन्क कॉलनीजवळ, उस्मानपुरा,
औरंगाबाद.

४) नागपूर सहकारी विभागीय मंडळ मर्यादित
सहकार मंदीर, टिळक रोड, महाल, नागपूर

५) मुंबई सहकारी बोर्ड लि.,
धन्नूर बिल्डिंग, ४था मजला,
सर फिरोजशहा मेहता रोड, फोर्ट,
मुंबई-४०० ००१.

## परिशिष्ट ३.२

### डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील सहकारी प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे

### शैक्षणिक कार्यक्रम - १९९१-९२ (नवा)

| अनु. | शैक्षणिक कार्यक्रमाचे नाव | मुदत आठवडे | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| | (अ) विद्यावेतनासहित - | | |
| १. | एच्.डी.सी. सहकारी व्यवस्थापन | ३६ | ३० |
| २. | डिप्लोमा कोर्स इन को-ऑप. ऑडीट | १४ | ३० |
| | (ब) विना विद्यावेतन - | | |
| ३. | संख्याशास्त्र व संशोधन पध्दती | १ | २० |
| ४. | बँकर व ग्राहक संबंध | १ | २० |
| ५. | मोठ्या आकारमानाच्या प्रक्रिया संस्थांचे | १ | २० |
| ६. | कर, हिशेब तपासणी आणि वित्तीय व्यवस्थापन | १ | २० |
| ७. | अर्बन को-ऑप. बँकांचे व्यवस्थापन | १ | २० |
| ८. | नाबार्डचा पुनर्वित्त पुरवठा | १ | २० |
| ९. | सहकारी बँकातील ठेवींची तरलता | १ | २० |
| १०. | पोलिस ऑफिसर्ससाठी ओरिएंटेशन कार्यक्रम | १ | २० |
| ११. | सहकारी बँकातील मनुष्यबळ विकास | १ | २० |
| १२. | डी.सी.सी. बँकेच्या धोरणाचा प्रभाव | १ | २० |
| १३. | डॉक्युमेंटेशन इन को-ऑप. अर्बन बँक्स् | १ | २० |

परिशिष्ट ३.२ (पुढे चालू...)

| अनु. | शैक्षणिक कार्यक्रमाचे नाव | मुदत आठवडे | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| | (क) स्पॉन्सर्ड प्रोग्रॅम - | | |
| १४. | पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेतील ऑफिसर्सना ट्रेनिंग | ३ दिवस | २० |
| १५. | सहकारी विपणन, ग्राहक संस्थामधील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण | २ आठवडे | ३० |
| १६. | दुग्ध विकास विभागातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण | २ आठवडे | ३० |
| १७. | प्रशिक्षण संस्थामध्ये काम करणाऱ्या अध्यापकांना प्रशिक्षण | २ आठवडे | ३० |